# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/४०९/२०१८, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०४/०८/२०१८


## "पोलीसांची तत्परता, जबरी चोरीचा गुन्हा घडताच आरोपींना केले अटक"

**पोलीस ठाणे तुमसर** :– तुमसर ते गोबरवाही रोड वरील कटंगी नाक्याजवळ ट्रक क्र. एम. एच. २० सी.टी. ४०४१ चालक नामे अशोक हेमराज फुलबांदे, वय २६ वर्ष, रा. कवळी ता. आमगाव जिल्हा गोंदिया नागपुर वरून तुमसर मार्गे नाकाडोंगरी येथे जात असता दिनांक २.०८.२०१८ चे रात्रीचे सुमारास ट्रक चालकांस रस्त्यामध्ये थांबवुन त्याचे गाडीतुन पेचकस काढुन त्याला दमदाटी व गालावर थापड मारुन त्याचे जवळील २९०० रूपये व त्याचे सोबत असणारा क्लीनर जवळील २५० रूपये असा एकुण ३१५० रूपये जबरीने हिसकावले व थोडया वेळानंतर नामे सुरींदरसिंह सरदार सिह नर रा. टेकानाका नागपुर हा आपले ट्रक क्र. एम. एच. ४० बी.जी. ६९९३ मध्ये बुटीबोरी नागपुर येथुन कोळसा भरुन घनसोर राज्य (म. प्र.) येथे जात असता वरील तिन्ही आरोपीतांनी सदर ट्रक ला अडवुन त्याला सुध्दा पेचकसने धाक दाखवुन त्याचे कडून ८४०० रूपये जबरीने हिसकावुन घटणास्थळावरून पळुन गेले. सदर दोन्ही ट्रक चालक यांनी घटणेची तक्रार दिलेवरून अज्ञात आरोपीतां विरूध्द पोलीस ठाणे तुमसर येथे कलम ३९२,३४ भादवी अन्वये वेगवेगळे गुन्हे नोंद तात्काळ गुन्हयाती फरार आरोपींचे शोध घेणे करीता ठाणेदार पोलीस निरीक्षक, मनोज सिडाम यांनी गुन्हयाची गंभिरता लक्षात घेवुन आपले कडील पोलीस अधिकारी, कर्मचारी पोउपनि. जटाळ व स्टॉफ पो. हवा. ठवरे, भोंगाडे, गाढवे, चौधरी, हुलगुंडे, भोंगाडे, गाढवे, चौधरी, तोरंबे पथके तयार करून रवाणा केले.

घटणेची माहिती मिळाल्याचे काही वेळात आरोपी नामे १) रोशन शम्मी रगडे, वय २६ वर्ष, रा. कुंभारे वार्ड तुमसर, २) राकेश सुनील मेश्राम, वय २० वर्ष रा. आंबेडकर वार्ड तुमसर यांना ताब्यात घेवुन चौकशी दरम्यान आरोपींनी गुन्हा केल्याबाबत कबुली दिली तसेच अभिनव मान, वय अंदाजे २० वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर हा सुध्दा गुन्हयात आरोपी असल्याबाबत सांगीतले. यांचेकडुन गुन्हयात पावरलेले साहीत्य व मोटार सायकल क्र. एम.एच. ३६ जे ६११४ जप्त करण्यात आलेली आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी, ठाणेदार पोलीस निरीक्षक, मनोज सिडाम यांचे मार्गदर्शनात गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोली. निरीक्षक किशोर झोटींग व पोलीस उप निरीक्षक संदिपान उबाळे करीत आहेत.


(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.